**RETINA PAINTS LIMITED** is proposing, subject to market conditions and other considerations, public issue of its Equity Shares and has filed the Prospectus with the Registrar of Companies, Hyderabad. The Prospectus is available on the website of the Lead Manager at www.gretexcorporate.com the website of the BSE Limited i.e., www.bsesme.com, and website of the Issuer Company at www.retinapaints.com Investors should note that investment in Equity Shares involves a high degree of risk. For details investors should refer to and rely on the Prospectus including the section titled "Risk Factors" beginning on page no. 26 of the Prospectus, which has been filed with ROC.

The Equity Shares have not been and will not be registered under the U.S. Securities Act 1933, as amended (the "Securities Act") or any state securities laws in the United States and may not be offered or sold within the United States or to, or for the account or benefit of, "U.S. persons" (as defined in Regulation S of the Securities Act), except pursuant to an exemption from, or in a transaction not subject to, the registration requirements of the Securities Act. Accordingly, the Equity Shares will be offered and sold (i) in the United States only to "qualified institutional buyers", as defined in Rule 144A of the Securities Act, and (ii) outside the United States in offshore transactions in reliance on Regulation S under the Securities Act and in compliance with the applicable laws of the jurisdiction where those offers and sales occur. The Equity Shares have not been and will not be registered, listed or otherwise qualified in any other jurisdiction outside India and may not be offered or sold, and Application may not be made by persons in any such jurisdiction, except in compliance with the applicable laws of such jurisdiction.

Raka

## संक्षिप्त

### फुटबॉल : अर्जेंटिना क्रमवारीत अग्रस्थानी

**झुरिच :** विश्वविजेता अर्जेंटिनाचा संघ सहा वर्षांत पहिल्यांदा ‘फिफा’ जागतिक क्रमवारीत अग्रस्थानी पोहोचला आहे. अर्जेंटिनाने गेल्या महिन्यात दोन मैत्रीपूर्ण सामन्यांत विजय मिळवले. त्यामुळे त्यांनी ब्राझीलला मागे टाकत अग्रस्थान मिळवले. ब्राझीलने मोरोक्कोकडून १-२ अशी हार पत्करल्याने त्यांची तिसऱ्या स्थानी घसरण झाली. विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात अर्जेंटिनाकडून पराभूत झालेला फ्रान्सचा संघ क्रमवारीत एका स्थानाच्या फायद्यासह दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. भारताचा संघ १०१व्या स्थानावर आहे.

### टेनिस : पेगुला, कीज यांची आगेकूच

**चार्ल्सटन :** अग्रमानांकित जेसिका पेगुला आणि माजी विजेती मेडिसन कीज यांनी चार्ल्सटन खुल्या टेनिस स्पर्धेच्या दुसऱ्या फेरीत सहज विजय नोंदवले. पेगुलाने ६५ मिनिटांपर्यंत चाललेल्या सामन्यात रशियाच्या एना ब्लिंकोवाला ६-२, ६-० असे पराभूत केले. तर, कीजने हेली बाप्टिस्टला ६-१, ६-२ अशा फरकाने नमवले. अन्य सामन्यात, रशियाच्या डारिया कसात्किनाने अमेरिकेच्या मेडिसन ब्रेंगलवर ६-२, ६-२ अशा विजयाची नोंद केली.

### क्रिकेट : स्पोर्टसफील्ड, व्हिक्टरी उपांत्य फेरीत

**मुंबई :** व्हिक्टरी क्रिकेट क्लबने महिला ट्वेन्टी-२० क्रिकेट लीगच्या उपांत्यपूर्व फेरीच्या सामन्यात पय्याडे स्पोर्ट्स क्लबवर सात गडी राखून विजय मिळवत आगेकूच केली. प्रथम फलंदाजी करणाऱ्या पय्याडेचा डाव २० षटकांत ८६ धावांत संपुष्टात आला. हे माफक आव्हान व्हिक्टरी क्लबने तीन गड्यांच्या मोबदल्यात १४ षटकांत पूर्ण केले. सैमा ठाकूर (३/१४) व निधी बुले (२/१६) यांनी व्हिक्टरीकडून प्रभावी मारा केला. अन्य उपांत्यपूर्व लढतीत स्पोर्ट्सफील्ड क्रिकेट क्लबने भारत क्रिकेट क्लबचा ३७ धावांनी पराभव केला.

### फुटबॉल : डॉन बॉस्को अकादमीचा विजय

**मुंबई :** ओमकार सिंगने झळकावलेल्या दोन गोलच्या बळावर मुंबई फुटबॉल संघटनेच्या लीगमधील पहिल्या विभागाच्या सामन्यात डॉन बॉस्को अकादमी संघाने यॉन एफसी संघावर ३-१ अशा फरकाने विजय मिळवला. ओमकारला राहुल थोरातची साथ मिळाली. पराभूत संघाकडून एकमेव गोल प्रग्नेश शेट्टीने केला. या विभागातील अन्य सामन्यात युथ सॉकर अकादमी संघाने रूद्र एफसी संघाला १-० अशा फरकाने नमवले.

# कर्णधार मार्करमवर नजर!

## आज सनरायजर्स हैदराबादसमोर लखनऊ सुपर जायंट्सचे आव्हान

पीटीआय, लखनऊ

**सलामीच्या लढतीत** पराभूत झाल्यानंतर दमदार पुनरागमनासाठी प्रयत्नशील असलेल्या सनरायजर्स हैदराबाद संघापुढे इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) ट्वेन्टी-२० क्रिकेटच्या सामन्यात शुक्रवारी लखनऊ सुपर जायंट्सचे आव्हान असेल. नवा कर्णधार एडिन मार्करमच्या उपलब्धतेमुळे हैदराबाद संघाची ताकद वाढणार असून त्याचे नेतृत्व कितपत प्रेरणादायी ठरते, हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट

दक्षिण आफ्रिकेचे प्रतिनिधित्व करत असल्याने मार्करमला राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सलामीच्या लढतीला मुकावे लागले होते. त्याच्या अनुपस्थितीत अनुभवी वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारने हैदराबाद संघाचे नेतृत्व केले. परंतु हैदराबादला राजस्थानकडून ७२ धावांनी पराभव पत्करावा लागला होता. मात्र, त्यानंतर मार्करमसह मार्को जॅन्सन आणि हेन्रिक क्लासन हे दक्षिण आफ्रिकेचे खेळाडू हैदराबादच्या संघात दाखल झाले. त्यामुळे लखनऊविरुद्धच्या सामन्यात हैदराबादचा संघ कामगिरी उंचावेल अशी अपेक्षा आहे.

हैदराबादच्या संघाने ‘आयपीएल’च्या गेल्या दोन हंगामांत निराशाजनक कामगिरी केली. २०२१मध्ये हैदराबादचा संघ गुणतालिकेत तळाला राहिला, तर १० संघांचा समावेश असलेल्या गेल्या हंगामात ते आठव्या स्थानावर होते. त्यामुळे हैदराबादच्या व्यवस्थापनाने मार्करमवर कर्णधारपदाची धुरा सोपवली. मार्करमच्या नेतृत्वाखाली सनरायजर्स इस्टर्न केप संघाने दक्षिण आफ्रिकन ट्वेन्टी-२० लीगच्या पहिल्या पर्वाचे जेतेपद मिळवले. आता तो हैदराबादच्या संघाला यश मिळवून देईल अशी चाहत्यांना व व्यवस्थापनाला आशा असेल.

यंदा सलामीच्या लढतीत हैदराबादला चांगला खेळ करता आला नाही. राजस्थानने ‘पॉवर-प्ले’मध्ये हैदराबादवर वर्चस्व गाजवले. प्रथम गोलंदाजीत ‘पॉवर-प्ले’च्या सहा षटकांत ८५ धावा दिल्यानंतर फलंदाजीत हैदराबादला २ बाद ३० धावाच करता आल्या. त्यामुळे हंगामातील पहिला विजय मिळवण्यासाठी हैदराबादच्या संघाला कामगिरीत बरीच सुधारणा करावी लागणार आहे.

दुसरीकडे, लखनऊ संघाला यंदाच्या हंगामात सुरुवातीला संमिश्र यश मिळाले आहे. सलामीच्या लढतीत दिल्ली कॅपिटल्सला नमवल्यानंतर दुसऱ्या सामन्यात लखनऊला चेन्नई सुपर किंग्जकडून पराभव पत्करावा लागला. त्यामुळे लखनऊ संघाचा कामगिरीत सातत्य आणण्याचा प्रयत्न असेल.

● **वेळ :** सायं. ७.३० वाजता
● **थेट प्रक्षेपण :** स्टार स्पोर्ट्स १, २, १ हिंदी, जिओ सिनेमा

### त्रिपाठी, अगरवालवर दडपण

सलामीच्या लढतीत हैदराबादकडून पदार्पण करताना मयांक अगरवालने काही चांगले फटके मारले. परंतु त्याने मोठी खेळी करणे आवश्यक आहे. राहुल त्रिपाठी आणि अभिषेक शर्मा खातेही उघडण्यात अपयशी ठरले. त्यामुळे त्यांच्यावर कामगिरी उंचावण्यासाठी दडपण असेल. मधल्या फळीत कर्णधार मार्करम, हॅरी ब्रूक आणि ग्लेन फिलिप्स यांच्याकडून हैदराबादला दमदार कामगिरीची अपेक्षा असेल. गोलंदाजी हैदराबाद संघाची जमेची बाजू मानली जाते. उमरान मलिक, नटराजन, भुवनेश्वर कुमार, फजलहक फरुकी आणि आदिल रशीद यांसारखे दर्जेदार गोलंदाज हैदराबादकडे आहेत. परंतु सलामीच्या लढतीत राजस्थानने हैदराबादविरुद्ध २०३ धावांची मजल मारली. त्यामुळे गोलंदाजांनी लौकिकाला साजेशी कामगिरी करणे गरजेचे आहे.




### केएल राहुलच्या कामगिरीची चिंता

कर्णधार आणि सलामीवीर केएल राहुलच्या कामगिरीची लखनऊ संघाला चिंता असेल. ‘आयपीएल’च्या पहिल्या दोन सामन्यांत त्याला सूर गवसला नाही. दिल्ली आणि चेन्नईविरुद्ध राहुल अनुक्रमे १२ चेंडूंत ८ धावा आणि १८ चेंडूंत २० धावा करून बाद झाला. राहुलचा सलामीचा साथीदार काएल मेयर्सने पहिल्या दोन्ही सामन्यांत आक्रमक अर्धशतके केली. परंतु क्विंटन डीकॉकच्या उपलब्धतेमुळे मेयर्सच्या जागेबाबत प्रश्न उपस्थित झाले आहेत. मधल्या फळीत दीपक हुडा, मार्कस स्टोइनिस आणि निकोलस पूरन यांना अपेक्षित कामगिरी करता आलेली नाही. गोलंदाजीत मात्र मार्क वूड आणि रवी बिश्नोई यांनी चमक दाखवली आहे.

# शार्दूलसमोर बंगळूरु निष्प्रभ

## कोलकाताचा ८१ धावांनी विजय

वृत्तसंस्था, कोलकाता


शार्दूल ठाकूर

**शार्दूल ठाकूरच्या** (२९ चेंडूंत ६८ धावा) अर्धशतकानंतर वरुण चक्रवर्ती (१५ धावांत ४ बळी) व पदार्पणवीर सुयश शर्मा (३० धावांत ३ बळी) या फिरकीपटूंच्या प्रभावी माऱ्याच्या जोरावर कोलकाता नाईट रायडर्स संघाने गुरुवारी ‘आयपीएल’च्या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळूरु संघावर ८१ धावांनी मोठ्या विजयाची नोंद केली.

कोलकाताने दिलेल्या २०५ धावांच्या आव्हानाचा पाठलाग करताना बंगळूरुचा डाव १७.४ षटकांत १२३ धावांत आटोपला. विराट कोहलीला (२१) सुनील नरेनने बाद केल्यानंतर बंगळूरुची फलंदाजांची फळी ढेपाळली. चक्रवर्तीने कर्णधार फॅफ ड्यूप्लेसिस (२३) आणि ग्लेन मॅक्सवेल (५) यांना झटपट बाद केले. बंगळूरुची अवस्था ७ बाद ८७ अशी बिकट झाली होती. यानंतर डेव्हिड विली (नाबाद २०) व आकाश दीप (१७) यांनी काही फटके मारले. मात्र, ते बंगळूरुचा पराभव टाळू शकले नाहीत.

त्यापूर्वी, कोलकाताची ५ बाद ८९ अशी बिकट स्थिती होती. मात्र, शार्दूल आणि रिंकू सिंह (३३ चेंडूंत ४६ धावा) यांनी केलेल्या शतकी भागीदारीच्या बळावर कोलकाताने २० षटकांत ७ बाद २०४ धावसंख्येपर्यंत मजल मारली. शार्दूलने आपल्या खेळीत ९ चौकार व ३ षटकार मारले.

### टॉपली ‘आयपीएल’बाहेर

वेगवान गोलंदाज रीस टॉपली खांद्याला झालेल्या दुखापतीमुळे ‘आयपीएल’च्या उर्वरित हंगामाला मुकणार आहे. टॉपलीला मुंबई इंडियन्सविरुद्ध चिन्नास्वामी येथे झालेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळूरुच्या पहिल्या सामन्यात दुखापत झाली होती.

### संक्षिप्त धावफलक

**कोलकाता :** २० षटकांत ७ बाद २०४ (शार्दूल ठाकूर ६८, रहमनुल्ला गुरबाझ ५७, रिंकू सिंह ४६; डेव्हिड विली २/१६) **विजयी वि. बंगळूरु :** १७.४ षटकांत सर्वबाद १२३ (फॅफ ड्यूप्लेसिस २३, विराट कोहली २१; वरुण चक्रवर्ती ४/१५, सुयश शर्मा ३/३०, सुनील नरेन २/१६)

# विल्यम्सन एकदिवसीय विश्वचषकाला मुकणार?

पीटीआय, वेलिंग्टन

**इंडियन प्रीमियर** लीगमध्ये (आयपीएल) गुजरात टायटन्सकडून खेळताना जायबंदी झालेला न्यूझीलंडचा कर्णधार केन विल्यम्सन वर्षाअखेरीस भारतात होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेला मुकण्याची शक्यता आहे. विल्यम्सनच्या उजव्या गुडघ्यावर शस्त्रक्रिया करावी लागणार असून त्याला बराच काळ मैदानाबाहेर राहावे लागू शकेल.

अहमदाबाद येथे झालेल्या चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या सलामीच्या लढतीत विल्यम्सनला क्षेत्ररक्षणादरम्यान दुखापत झाली. सीमारेषेवर चेंडू अडवण्यासाठी त्याने उंच सूर मारला आणि त्यानंतर खाली येताना त्याच्या शरीराचा पूर्ण भार उजव्या गुडघ्यावर आला. त्याला गंभीर दुखापत झाली. त्यामुळे विल्यम्सन न्यूझीलंडला परतला.



त्याच्यावर झालेल्या स्कॅनमधून गुडघ्याच्या ‘एंटीरियर क्रूसिएट लिगामेंट’मध्ये (एसीएल) फ्रॅक्चर असल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे त्याला शस्त्रक्रिया करावी लागणार आहे.

‘‘विल्यम्सनवर आगामी तीन आठवड्यांमध्ये शस्त्रक्रिया करण्यात येईल,’’ असे न्यूझीलंड क्रिकेटने आपल्या निवेदनात म्हटले आहे. दरम्यानच्या काळात दिलेल्या पाठिंब्याबद्दल विल्यम्सनने न्यूझीलंड क्रिकेट संघटना आणि आपल्या ‘आयपीएल’ संघाचे आभार मानले. ‘‘गेल्या काही दिवसांत मला खूप सहकार्य मिळाले. त्याकरिता मी न्यूझीलंड क्रिकेट संघटना आणि गुजरात टायटन्सचे आभार मानतो. मी जायबंदी झाल्याने निराश आहे. माझे लक्ष्य आता शस्त्रक्रिया आणि त्यानंतर तंदुरुस्ती मिळवण्यावर असणार आहे. याकरिता काही काळ लागेल. मात्र, लवकरात लवकर मैदानावर उतरण्याचा माझा प्रयत्न असेल,’’ असे विल्यम्सन म्हणाला.

अशा पद्धतीच्या दुखापतीनंतर पूर्ण तंदुरुस्ती मिळवण्यासाठी काही महिन्यांचा कालावधी लागतो. त्यामुळे विल्यम्सन ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेपूर्वी पूर्ण तंदुरुस्त होण्याची शक्यता कमी आहे.

# मुंबई इंडियन्सच्या संघात रिचर्डसनच्या जागी मेरेडीथ

**नवी दिल्ली :** जायबंदी जाय रिचर्डसनच्या जागी मुंबई इंडियन्स संघाने उर्वरित ‘आयपीएल’ हंगामासाठी ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज रायली मेरेडीथला करारबद्ध केले आहे.



पायाच्या दुखापतीमुळे रिचर्डसनला ‘आयपीएल’च्या संपूर्ण हंगामाला मुकावे लागणार आहे. त्याची जागा घेणाऱ्या मेरेडीथने ऑस्ट्रेलियाचे पाच ट्वेन्टी-२० सामन्यांत प्रतिनिधित्व करताना आठ बळी मिळवले आहेत. २६ वर्षीय मेरेडीथ गेल्या ‘आयपीएल’ हंगामात मुंबईकडूनच खेळला होता.

# ‘आयपीएल’मध्ये सर्वोत्तम कामगिरीसाठी उत्सुक - वूड

पीटीआय, लखनऊ

**विश्वचषक स्पर्धांमध्ये** चमकदार कामगिरी केली असली, तरी आता इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) क्रिकेटमध्ये सर्वोत्तम कामगिरी आपल्याला खुणावत असल्याचे लखनऊ सुपर जायंट्सचा वेगवान गोलंदाज मार्क वूड म्हणाला.

पाच वर्षांपूर्वी चेन्नई सुपर किंग्जकडून ‘आयपीएल’ पदार्पण करताना वूडने निराशाजनक कामगिरी केली होती. पदार्पणाच्या सामन्यात त्याने चार षटकांत ४९ धावा दिल्या होत्या आणि त्याची बळींची पाटीही कोरी राहिली. परंतु यंदा लखनऊचे प्रतिनिधित्व करताना वूडने दोन सामन्यांत आठ बळी मिळवले आहेत. तसेच सातत्याने ताशी १४५ किमीहून अधिकच्या वेगाने गोलंदाजी करताना त्याने प्रतिस्पर्धी संघातील फलंदाजांना अडचणीत टाकले आहे.



‘‘मी इंग्लंडसाठी एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० विश्वचषक स्पर्धांच्या अंतिम सामन्यांत खेळलो आहे. परंतु ‘आयपीएल’मध्ये मला स्वतःला सिद्ध करता आलेले नाही. त्यामुळे यंदाच्या ‘आयपीएल’मध्ये सर्वोत्तम कामगिरी करत विश्वातील आघाडीच्या खेळाडूंमध्ये स्थान मिळवण्याचा माझा प्रयत्न आहे. मी जागतिक स्तराचा गोलंदाज असल्याचे यंदाच्या स्पर्धेत सिद्ध करेन,’’ असे वूडने नमूद केले.

वूडने यंदा सलामीच्या लढतीत दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध १४ धावांत ५ बळी मिळवले, मग दुसऱ्या सामन्यात चेन्नईविरुद्ध ४९ धावांत ३ गडी बाद केले. ‘‘२०१८मध्ये ‘आयपीएल’ पदार्पणासाठी मी पूर्णपणे तयार नव्हतो. मी न्यूझीलंडमध्ये कसोटी सामने खेळून आलो होतो. त्यामुळे ट्वेन्टी-२० सामने खेळण्यासाठी आवश्यक तयारी मी केली नव्हती. मात्र, ही माझीच चूक होती. यंदा ही चूक सुधारण्यासाठी मी उत्सुक आहे,’’ असे वूड म्हणाला.

गेल्या हंगामापूर्वीच्या लिलावात लखनऊने वूडवर ७.५ कोटी रुपयांची विजयी बोली लावली होती. परंतु कोपराच्या दुखापतीमुळे त्याला गेल्या संपूर्ण हंगामाला मुकावे लागले होते. मात्र, त्यानंतरही लखनऊने त्याला संघात कायम ठेवले आणि पहिल्या दोन सामन्यांत त्याने चमक दाखवली आहे.

# प्रियांशू राजावत उपांत्यपूर्व फेरीत



ऑरलिन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धा

**ऑरलिन्स (फ्रान्स) :** भारताच्या प्रियांशू राजावतने अग्रमानांकित जपानच्या केंटो निशिमोतोला पराभवाचा धक्का देत गुरुवारी ऑरलिन्स मास्टर्स बॅडमिंटन स्पर्धेत (सुपर ३०० दर्जा) पुरुष एकेरीच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला.

जागतिक क्रमवारीत ५८व्या स्थानी असलेल्या राजावतने गेल्या रविवारी माद्रिद मास्टर्स स्पर्धेचे जेतेपद मिळवणाऱ्या जागतिक क्रमवारीत १२व्या स्थानी असलेल्या निशिमोतोला २१-८, २१-१६ असे पराभूत केले. राजावतने अप्रतिम सुरुवात करताना पहिल्या गेममध्ये १०-० अशी आघाडी मिळवली आणि पुढे निशिमोतोला कोणतीच संधी दिली नाही. पहिला गेम गमावल्यानंतर जपानच्या खेळाडूने दुसऱ्या गेममध्ये चांगली सुरुवात करताना ६-२ अशी आघाडी घेतली. मात्र, राजावतने १०-१० अशी बरोबरी साधली. यानंतर राजावतने सलग सहा गुणांची कमाई करताना १६-११ अशी आघाडी मिळवली. निशिमोतोने पुनरागमनाचा प्रयत्न केला. मात्र, राजावतने आपली आघाडी कायम राखताना गेमसह सामना जिंकला.

महिला एकेरीच्या लढतीत तानिया हेमंत नात्सुकी निदैराकडून ८-२१, १७-२१ अशी पराभूत झाली. मिश्र दुहेरीत साई प्रतीक के व तनिषा क्रॅस्टो जोडीला मलेशियाच्या शेन टँग जी व तोह ए वेईकडून २३-२१, १७-२१, २१-२३ असा पराभव पत्करावा लागला.

### मिथुन मंजुनाथचे आव्हान संपुष्टात

मिथुन मंजुनाथचे स्पर्धेतील आव्हान संपुष्टात आले. पुरुष एकेरीच्या सामन्यात मंजुनाथने चायनिज तैपेईच्या चि यू जेनकडून १५-२१, १९-२१ अशी हार पत्करली. सामन्याच्या सुरुवातीपासून दोन्ही खेळाडूंमध्ये चुरस पाहायला मिळाली. मात्र, निर्णायक क्षणी मंजुनाथला आपला खेळ उंचावता आला नाही.

# कालिकेश सिंह देव रायफल संघटनेच्या अध्यक्षपदी



**नवी दिल्ली :** रणिंदर सिंग यांनी दीर्घ काळासाठी रजा घेतल्यानंतर उपाध्यक्ष कालिकेश नारायण सिंह देव यांची भारतीय राष्ट्रीय रायफल संघटनेच्या अध्यक्षपदी निवड झाली आहे.

क्रीडा संहितेनुसार, राष्ट्रीय महासंघांचे अध्यक्ष १२ वर्षांहून अधिक कालावधीसाठी आपल्या पदावर राहू शकत नसल्याचे क्रीडा मंत्रालयाने स्पष्ट केले होते. रणिंदर यांनी अध्यक्षपदावर १२ वर्षांचा कालावधी (२९ डिसेंबर २०१० ते २९ डिसेंबर २०२२) पूर्ण केल्याचे क्रीडा मंत्रालयाने गेल्या महिन्यात सांगितले होते. गुरुवारी रायफल संघटनेच्या कार्यकारी परिषदेच्या बैठकीत अध्यक्षपदासाठी कालिकेश सिंह देव यांच्या नावावर एकमत झाले.

# आशियाई क्रीडा स्पर्धेतील सहभागाबाबत साशंक - हम्पी

**नवी दिल्ली :** भारताची तारांकित महिला ग्रँडमास्टर बुद्धिबळपटू कोनेरू हम्पी करोनाच्या भीतीमुळे या वर्षी चीनमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत खेळण्याबाबत साशंक आहे. हम्पीने यापूर्वी आशियाई क्रीडा स्पर्धेत दोन सुवर्णपदके पटकावली आहेत.

२०२०मध्ये चीन येथेच करोनाचे रुग्ण सर्वप्रथम सापडले होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या माहितीनुसार, ३ जानेवारी २०२० ते ५ एप्रिल २०२३ या कालावधीत चीनमध्ये ९ कोटी ९२ लाख ३८ हजार ५८६ करोनाचे रुग्ण सापडले असून १ लाख २० हजार ८९६ जणांचा करोनामुळे मृत्यू झाला आहे. परंतु गेल्या २४ तासांत चीनमध्ये नव्या करोनाबाधितांची नोंद झालेली नाही. असे असले तरी हम्पी चीनमध्ये जाणे टाळण्याची शक्यता आहे.



चीनमधील हांगझोऊ येथे गेल्या वर्षी आशियाई क्रीडा स्पर्धा आयोजित केली जाणार होती. मात्र, करोनाच्या प्रादुर्भावामुळे ही स्पर्धा एका वर्षाने लांबणीवर पडली. आता या वर्षी होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेत तब्बल १३ वर्षांनंतर बुद्धिबळ खेळाचे पुनरागमन होणार आहे. या स्पर्धेबाबत विचारले असता हम्पी म्हणाली, ‘‘आशियाई क्रीडा स्पर्धा चीनमध्ये आयोजित केली जाणार असल्याने माझ्या सहभागाबाबत साशंकता आहे. जून-जुलैपर्यंत मी अंतिम निर्णय घेईन. करोनाच्या भीतीमुळे मला या स्पर्धेतील सहभागाबाबत विचार करावा लागतो आहे.’’



# गोरयाचकिना विजेती

**नवी दिल्ली :** रशियाची ग्रँडमास्टर अलेक्सांड्रा गोरयाचकिनाने ‘फिडे’ महिलांच्या ग्रांप्री बुद्धिबळ स्पर्धेतील तिसऱ्या टप्प्याचे जेतेपद पटकावले. गोरयाचकिना, कझाकस्तानची बिबिसारा असाउबायेव्हा आणि चीनची झू जिनेर या तिघींचे समान गुण होते. मात्र, ‘टायब्रेकर’मधील सरस गुणफरकामुळे गोरयाचकिनाला विजयी घोषित करण्यात आले.

महिलांच्या चार ग्रांप्री स्पर्धांमधील ही तिसरी स्पर्धा होती. या ग्रांप्री मालिकेतील चौथी स्पर्धा सायप्रस येथे १५ ते २८ मे या कालावधीत होणार आहे.

# संघर्ष, स्वराज्य संघांची विजयी सलामी

**मुंबई :** मुंबई उपनगर जिल्हास्तरीय चषक कबड्डी स्पर्धेत महिला गटात संघर्ष, स्वराज्य आणि पुरुष अ-विभागात शूर संभाजी संघांनी विजयी सलामी दिली.

जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा

विक्रोळी पार्क साइट, जांभळी नाका येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदानात सुरू झालेल्या या स्पर्धेतील महिलांच्या सलामीच्या लढतीत गोरेगावच्या संघर्ष क्रीडा मंडळाने चुनाभट्टीच्या आराध्य सेवा संघाचा ५१-४७ असा पराभव केला. संघर्षच्या विजयात प्रणाली नागदेवते, पायल गोळे यांचा महत्त्वाचा वाटा होता. दुसऱ्या सामन्यात कांजुरमार्गच्या स्वराज्य स्पोर्ट्स क्लबने भांडुपच्या स्नेहविकास क्रीडा मंडळावर २८-२६ असा निसटता विजय मिळवला.

किशोर गटात घाटकोपरच्या जय लहुजी क्रीडा मंडळाने सुनील सिंग, आशितोष इंगलच्या शानदार खेळाच्या जोरावर भांडुपच्या मातृछाया मंडळाचा ४४-२२ असा पराभव केला.

प्रथम श्रेणी पुरुष गटात कुर्ल्याच्या शूर संभाजी क्रीडा मंडळाने एकतर्फी लढतीत विक्रोळीच्या गुरुकृपा संघाला ३५-१० असे नमवले. घाटकोपरच्या वीर परशुराम संघाने विक्रोळीच्या टागोर नगर संघाचा ३३-१८ असा पराभव केला. वीर परशुराम संघातर्फे चढाईपटू अभिषेक पडेलकरने छाप पाडली.


**LTIMindtree**

**एलटीआयमाइंडट्री लिमिटेड**

(लार्सन अँण्ड टूब्रो इन्फोटेक लिमिटेड म्हणून पूर्वज्ञात)

सीआयएन: L72900MH1996PLC104693

**नोंदणीकृत कार्यालय:** एल अँण्ड टी हाऊस, बॅलार्ड इस्टेट, मुंबई-४०० ००१

**कॉर्पोरेट कार्यालय:** टेक्नॉलॉजी टॉवर १, गेट क्र. ५, साकी विहार रोड, पवई, मुंबई - ४०० ०७२

**दू.क्र.:** +९१ २२ ६७७६ ६७७६; **फॅक्स क्र.:** +९१ २२ ६७७६ ६००४

**ई-मेल:** investor@ltimindtree.com; **संकेतस्थळ:** www.ltimindtree.com

**गुंतवणूकदार शिक्षण आणि संरक्षण निधी प्राधिकरणला (आयईपीएफ) कंपनीच्या समभागांचे हस्तांतरण**

शेअरधारकांना याद्वारे कळविण्यात येते की, वेळोवेळी सुधारीत अनुसार गुंतवणूकदार शिक्षण आणि सुरक्षा निधी प्राधिकरण (लेखांकन, लेखापरीक्षण, हस्तांतरण आणि परतावा) नियम, २०१६ (नियम) सहवाचित कंपनी कायदा, २०१३ च्या अनुच्छेद १२४ (६) च्या अनुरोधारे लागोपाठच्या सात वर्षांसाठी दावा केलेला नाही अश्या लाभांशांच्या संदर्भामध्ये सर्व शेअर्स गुंतवणूकादार शिक्षण आणि संरक्षण निधी (आयईपीएफ) प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणे कंपनीला आवश्यक आहे.

नियमाच्या परिभाषेमध्ये, वित्तीय वर्ष २०१५-१६ दरम्यान अंतिम लाभांश घोषीत करण्यात आला, जो सात वर्षांच्या कालावधीसाठी अदा न करता/दावा न केल्यामुळे राहीला आहे आणि त्या लागोपाठ सात वर्ष दावा न केलेल्या लाभांश संबंधीत शेअर्स ०६ जुलै, २०२३ रोजी आयईपीएफकडे जमा करणे देय आहे.

आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी देय असलेल्या शेअर्सच्या संबंधीत भागधारकांना कंपनीने व्यक्तिगत पत्र व्यवहार केला आहे. ज्यांचे शेअर्स आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यासाठी देय असलेल्या शेअर्सच्या भागधारकांचा तपशील कंपनीने त्यांच्या संकेतस्थळ www.ltimindtree.com वरील इन्व्हेस्टर सेक्शनवरसुध्दा अपलोड केले आहे.

आयईपीएफ प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करण्यात येणारी लाभांश रक्कम/शेअर्स टाळण्यासाठी, वित्तीय वर्ष २०१५-१६ आणि त्यापुढील वर्षा दरम्यान घोषीत अंतिम लाभांशाचा दावा न केलेल्या संबंधीत भागधारकांना **०३ जुलै, २०२३ रोजी किंवा तत्पूर्वी** दावा करण्याची विनंती करण्यात येत आहे.

शेअर्स आणि दावा न केलेल्या लाभांश संबंधामध्ये दावा न केल्यास कंपनीला ते आयईपीएफ प्राधिकरणाच्या खात्यामध्ये हस्तांतरीत करावे लागतील यांची भागधारकांनी कृपया नोंद घ्यावी आणि या संदर्भात कंपनीच्या विरोधात दावा करता येणार नाही. आयईपीएफ प्राधिकरणाकडे अदा न केलेला लाभांश आणि शेअर्स हस्तांतरीत केल्यावर, भागधारक आयईपीएफ प्राधिकरणाकडे नियमामध्ये दिलेल्या पध्दतीनुसार अर्ज करून त्यांचा दावा करू शकतील.

उपरोक्त प्रकरणामधील कोणत्याही चौकशीसाठी, कृपया कंपनी निबंधक आणि हस्तांतरण एजंट, लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, युनिट: एलटीआयमाइंडट्री लिमिटेड, सी-१०१, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (प.), मुंबई-४०००८३, दूरध्वनी +९१ २२ ४९१८ ६०००, ईमेल: rnt.helpdesk@linkintime.co.in यांना संपर्क करावा.

**एलटीआयमाइंडट्री लिमिटेड करता**
हस्ता/-
**त्रिदीब बरात**
कंपनी सचिव
आणि अनुपालन अधिकारी

स्थळ: मुंबई
दिनांक: ०७ एप्रिल, २०२३



राष्ट्रीय परीक्षा एजेंसी
National Testing Agency
(उच्चतर शिक्षा विभाग, शिक्षा मंत्रालय, भारत सरकार के तहत एक स्वायत्त संगठन)
(An Autonomous Organization under the Department of Higher Education, Ministry of Education, GoI)
IIM BODH GAYA
IIM JAMMU

**जाहीर सूचना**
**दिनांकित : ०६.०४.२०२३**
**जॉइन्ट इंटिग्रेटेड प्रोग्राम इन मॅनेजमेन्ट ॲडमिशन टेस्ट (जेआयपीएमएटी) २०२३ करिता ऑनलाइन प्रपत्र**

दी नॅशनल टेस्टिंग एजन्सी (एनटीए) ही शिक्षण मंत्रालय, भारत सरकारद्वारा एक स्वतंत्र, स्वायत्त, आत्मनिर्भर आणि स्वयंपूर्ण प्रमुख परीक्षा संघटना म्हणून स्थापन करण्यात आली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करिता आयआयएम बोध गया आणि आयआयएम जम्मू येथील मॅनेजमेन्टमधील ५ वर्षीय इंटिग्रेटेड प्रोग्रामसाठी प्रवेशाकरिता एनटीए, पुढील तपशिलांनुसार जेआयपीएमएटी २०२३चे संचालन करणार आहे.

| | |
|---|---|
| **ऑनलाइन अर्ज प्रपत्र सादरीकरणाची तारीख** | **०६ एप्रिल २०२३ ते ३० एप्रिल २०२३ (सायं. ५ वाजे.) पर्यंत** |
| **ऑनलाइन अर्ज शुल्क सादरीकरणाची तारीख** | **३० एप्रिल २०२३ (रात्री ११.५० वाजे.) पर्यंत** |
| **परीक्षेची तारीख** | **२८ मे २०२३ (रविवार)** |
| **परीक्षेची पद्धत** | कॉम्प्युटर बेस्ड टेस्ट (सीबीटी) |
| **प्रश्नपत्रिकेचा आकृतिबंध** | बहु पर्यायी प्रश्न |
| **व्यवस्थापनाच्या ५ वर्षीय इंटिग्रेटेड प्रोग्राममधील प्रवेशासाठी पात्रता** | उमेदवार कला/ वाणिज्य/ विज्ञान शाखेतील १०+२/XII/एचएससी किंवा समकक्ष परीक्षा २०२१, २०२२ वर्षात उत्तीर्ण झाला असावा किंवा २०२३ मध्ये परीक्षा देत असावा. उमेदवार १०वी इयत्तेची परीक्षा २०१९ पूर्वी नसलेल्या वर्षी उत्तीर्ण झाला असला पाहिजे. आयआयएम्स (बोध गया आणि जम्मू) करिता पात्रताविषयक गरजा वेगवेगळ्या असू शकतात, उमेदवारांनी यासाठी आयआयएम बोध गया आणि आयआयएम जम्मूची वेबसाइट पाहावी. |
| **परीक्षा शुल्क** | जन-ईडब्ल्यूएस/एससी/एसटी/पीडब्ल्यूडी/ट्रान्सजेन्डर करिता रु. १०००/- आणि जनरल/ ओबीसी (एनसीएल) करिता रु. २०००/- |

परीक्षेची योजना/ कालावधी/ माध्यम/ अभ्यासक्रम, पात्रता कसोट्या, तात्पुरता प्रवेश, आसनांचे आरक्षण, परीक्षेची शहरे, महत्त्वाच्या तारखा इत्यादी गोष्टी www.nta.ac.in/ https://jipmat.nta.ac.in येथे प्रसारित केलेल्या माहिती परिपत्रकात नमूद केल्या आहेत.

परीक्षा देऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी जेआयपीएमएटी २०२३ करिताचे सविस्तर माहिती परिपत्रक वाचावे आणि https://jipmat.nta.ac.in वर केवळ **ऑनलाइन** अर्ज करावा.

परीक्षा शुल्क सुद्धा नेट बँकिंग/ डेबिट कार्ड/ क्रेडिट कार्ड/ यूपीआयच्या माध्यमातून एसबीआय बँक पेमेन्ट गेटवेचा उपयोग करून उपरोल्लेखित प्रमाणे **ऑनलाइन** प्रदान करावे लागेल.

कोणत्याही अद्ययत माहितीकरिता वेळोवेळी उपरि वेबसाइट्सना भेट देण्याची सूचना सुद्धा उमेदवारांना करण्यात येत आहे.

**वरिष्ठ संचालक (परीक्षा)**

वेबसाइट : **www.nta.ac.in/ https://jipmat.nta.ac.in**
ईमेल आयडी : **jipmat@nta.ac.in** हेल्पलाइन नं. : ०११-४०७५९०००

**सीबीसी२१३५४/१२/०००१/२३२४**



हे पत्र वैदेही ठकार यांनी मालक द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड (आधीचे नाव - द इंडियन एक्स्प्रेस लिमिटेड) यांच्यासाठी इंडियन एक्स्प्रेस प्रेस, प्लॉट नं. ईएल-२०८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१० येथे छापून मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१ येथे प्रसिद्ध केले. **लोकसत्ता कार्यालय :** मफतलाल सेंटर, सातवा मजला, रामनाथ गोएंका मार्ग, नरिमन पॉइंट, मुंबई-४०० ०२१. दूरध्वनी : २२०२२६२७/६७४४०००० फॅक्स : २२८२२१८७.
**महापे कार्यालय :** प्लॉट नं. ईएल १३८, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, महापे, नवी मुंबई-४०० ७१०. दूरध्वनी : ०२२-२७६३९९००; फॅक्स : ०२२-२७६३३००८. **पुणे कार्यालय :** एक्स्प्रेस हाऊस, प्लॉट नं. १२०५ /२/६, शिरोळे रस्ता, शिवाजीनगर, पुणे - ४११ ००४ . दूरध्वनी : ०२०-६७२४१०००. **नागपूर कार्यालय :** प्लॉट. नं. ३८, ॲडिसन ट्रेड सेंटर, पहिला मजला, डागा ले-आऊट (अंबाझरी) नागपूर-४४००१०. दूरध्वनी : ०७१२-२२३०४२१, २२३६८९७.
■ **अध्यक्ष, संचालक मंडळ : विवेक गोएंका** ■ **कार्यकारी प्रकाशक : वैदेही ठकार** ■ **संपादक : गिरीश कुबेर** ■ **निवासी संपादक : सिद्धार्थ खांडेकर*** (* पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे.) R. N. I. Reg. No. 1591/57

© द इंडियन एक्स्प्रेस (पी) लिमिटेड. सर्व हक्क सुरक्षित. लेखी अनुमतीशिवाय संपूर्ण अथवा अंशतः पुनःप्रकाशनास वा पुनःप्रसारणास मनाई.
■ कोलकाता, दिल्लीसाठी प्रत्येकी १० रुपये.

epaper.loksatta.com